Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

ISSN
2582-9173

# महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या पाणी प्रश्नासंदर्भातील अस्मिता दर्शक लढा



| **प्रा. नरेश व्ही. झाडे** | **प्रा. डॉ. रुपेश एम. मेश्राम** |
|---|---|
| श्री गोविंदप्रभू कला, वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बाळापूर), जि. चंद्रपूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर |



---

**प्रस्तावना :**

हिंदू धर्मातील नेते मंडळी ज्यावेळी 'स्वातंत्र्याचा लढा' लढत होते, त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानव मुक्तीचा लढा लढत होते. त्यांना येथील तमाम शोषित, पीडित अस्पृश्यांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व मानसिक गुलामगिरीतून मुक्ती मिळवून द्यायची होती. त्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला चवदार तळ्याचा संघर्ष हा केवळ पाण्याचा संघर्ष नव्हता, तर तो अस्पृश्यांच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा संघर्ष होता. महाड येथील चवदार तळ्याच्या संघर्षाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'धर्मसंगर' म्हणून संबोधित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात, "अस्पृश्य लोक पाणी घेण्याकरिता चवदार तळ्यावर गेले म्हणून मारामारी झाली असे म्हटल्याने घडलेल्या प्रकाराचे खरे स्वरूप उघड होत नाही. झालेल्या प्रकाराचे खरे स्वरूप अगदी निराळे आहे. त्यास दंगा म्हणण्यापेक्षा धर्मसंगर म्हणणे जास्त यथार्थ होईल असे आमचे मत आहे. कारण हिंदू समाजाचे घटक व हिंदू धर्माचे अनुयायी न्याय या नात्याने इतर हिंदू जातीच्या मानाने आपण सारख्या योग्यतेचे अधिकारी असून, आपले हक्क सारखे आहेत किंवा नाहीत, ते ठरविण्याविषयीचा प्रश्न या पाणी प्रकरणाच्या मुळाशी होता हे खास."

**महाडचे चवदार तळे :**

अस्पृश्याचा पाण्यासाठी संघर्ष ज्या ठिकाणी झाला, त्या ठिकाणाचे नाव आहे महाडचे चवदार तळे. चवदार तळे ज्या आठ मोठ्या तलावांभोवती महाडच्या विविध वस्त्या वसल्या आहेत त्यापैकी एक महत्त्वाचा तलाव. चवदार तळे म्हणजे महाडचा मानवबिंदू. "५२५ फूट लांब आणि ३०० फूट रुंदीचा हा विस्तीर्ण जलाशय. एकूण क्षेत्रफळ ३ एकर २४ गुंठे आणि ७६ चौरसवार. रखरखत्या उन्हाळ्यातही पाणी आटत नाही. गावच्या उत्तरेला हा जलाशय आहे. सभोवती प्रामुख्याने ब्राम्हणवस्ती असल्याने ब्राम्हणांचा जणू बालेकिल्लाच. म्हणून आंदोलनात या जलाशयावर प्रहार महत्त्वाचा होता."

**बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाच्या सामाजिक आणि राजकीय अडचणी सरकार पुढे मांडण्यासाठी एक मध्यवर्ती मंडळ असावे, या विषयी विचारविनिमय करण्यासाठी ९ मार्च १९२४ रोजी सायंकाळी ४ वाजता परडच्या दामोदर ठाकरशी सभागृहात सभा बोलविली. अस्पृश्य समाजातील सर्व नवे जुने कार्यकर्ते आणि समाजसेवक एकत्र जमले होते. त्या सभेतील ठरावानुसार २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत

हितकारिणी सभा' या सामाजिक संस्थेचा जन्म झाला. 'बहिष्कृत हितकारिणी सभेचे' कार्य जोरात सुरू झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सभा गाजू लागल्या. अधिवेशने होऊ लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गावोगावी जाऊन आपल्या सुबोध व तर्कशुद्ध वाणीने अस्पृश्यांच्या मनात स्वाभिमान जागवित होते. मेलेल्या जनावरांचे मांस खाऊ नका, मेलेली ढोरे ओढू नका, चांगले कपडे घाला, शिक्षण घ्या अशा अनेक गोष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य बांधवांना समजावून देत होते. त्यांचे कळकळीचे आणि तळमळीचे शब्द अवघ्या महाराष्ट्रातील अस्पृश्यांच्या घरांघरातून निनादत होते. अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणी होऊ लागली होती.

**मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये एक ठराव :**

१९२३ साली रा. ब. सी. के. बोले यांनी मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये एक ठराव संमत करून सार्वजनिक शाळा, धर्मशाळा, पानवठे अस्पृश्यांना खुले केले होते. कायद्याने मिळालेला अधिकार प्रत्यक्षात उतरणे आवश्यक होते. पहिली तोफ कुठे डागायची हा प्रश्न होता. पहिला हल्ला वारकरी संप्रदायाचे 'भक्तिपीठ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या पंढरपुरावर चळवावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात आले. परंतु विचारा अंती हा निर्णय बदलून महाडची निवड करण्यात आली.

महाड म्हणजे रायगडची बाजारपेठ. जणू मराठेशाहीची पावसाळी राजधानीच. महाड हे नगरपालिका असलेले शहर. सुरबा टिपणीस नगरपालिकेचे अध्यक्ष होते. नगरपालिकेचा अध्यक्ष होताच सुरबा टिपणीसांनी दिनांक ०५/०१/१९२४ रोजी नगरपालिकेच्या ठराव क्रमांक ६७ अन्वये महाड शहरातील सर्व सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांसाठी खुले केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात आले की, महाडच बिनीची आघाडी उघडणार! देवदेवस्कीचा अंमल असलेल्या या भागात, या चळवळीने होणाऱ्या क्रांतीच्या ठिणग्या पडतील व ती कल्पना जळून जाईल. अशाच इतर भोळ्या धार्मिक कल्पना जळाल्या, तर प्रथम अस्पृश्य समाज धार्मिक कल्पनांच्या जाळ्यातून मुक्त होईल आणि या मुक्त अस्पृश्यांना पाहून स्पृश्य समाजाच्या अंतर्यामातील अंध:कार दूर होईल. महाडला शनिवार व रविवार दिनांक १९ आणि २० मार्च १९२७ या दिवशी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरवायचे ठरले.

**महाडची ऐतिहासिक परिषद :**

१९ मार्च १९२७ ला दुपारी २ ते २.३० च्या दरम्यान श्री विरेश्वर थेएटरात कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन सुरू झाले. अस्पृश्यांच्याच नव्हे तर एकूण भारतीय जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणण्यारी ही परिषद होती. दलितांना 'तू माणूस आहेस व मानवी हक्कासाठी तुला झगडलेच पाहिजे' असा क्रांतीचा मंत्र देणारी ही परिषद होती. सुरबा टिपणीस, सुभेदार विश्राम गंगाराम सवादकर, संभाजी तुकाराम गायकवाड, शिवराम गोपाळा जाधव, अनंतराव चित्रे, रामचंद्र मोरे इत्यादी पुढाऱ्यांनी ही परिषद यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतले. खेड्यापाड्यातून परिषदेचा प्रचार करण्यात आला. त्यामुळे पंधरा वर्षाच्या तरुणांपासून ते ७५ वर्षाच्या वृद्धांपर्यंत कोकण घाट, मुंबई नी नागपूर या विभागातून सुमारे ५००० अस्पृश्य बांधव पाठीवर भाकऱ्या बांधून परिषदेसाठी आले होते. महाडातील पु. प्र तथा बापूराव जोशी, धारिया, तुळजाराम मिठादी स्पृश्य पुढारी परिषदेस उपस्थित होते. सीतारामपंत शिवनकर, गंगारामपंत नी. सहस्रबुद्धे, अनंतराव चित्रे,

भा. गायकवाड, बाळाराम आंबेडकर, पा. न. राजभोज, शांताराम अ. उपशाम, रामचंद्र मोरे, रामचंद्र शिर्के या परिषदेसाठी आले होते. महाडच्या तळभागात चवदार तळ्यापासून सुमारे दोन फर्लागांवर बांबू आणि झापांनी तयार केलेल्या मंडपात ही परिषद भरली.

**महाड परिषदेचा कार्यारंभ :**

महाड परिषदेचा कार्यारंभ परिषदेचे स्वागताध्यक्ष संभाजी गायकवाड यांच्या भाषणाने झाला. फाटकी, मळकी वस्त्रे वापरून आलेल्या त्या अस्पृश्य बांधवांच्या प्रचंड जनसमुदायासमोर बंगाली पद्धतीचे धोतर नेसलेले आणि सदरा, कोट पेहराव केल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणास सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, “आपली मायभूमी म्हणून ज्याला जो प्रदेश जिव्हाळ्याचा वाटतो त्यांचा आनंद द्विगुणीत झाला, तर त्यात काही नवल नाही. परंतु आजच्या प्रसंगी मला जितका आनंद तितकाच खेद ही होतो, असे म्हटल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. एक वेळ अशी होती की, हा प्रदेश अस्पृश्य जातीच्या दृष्टीने पाहता फारच पुढे गेलेला होता, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. एकेकाळी अस्पृश्य वर्गच शिक्षणात पुढारलेला होता.” ज्या कारणांमुळे अस्पृश्यांची उन्नती झाली होती, त्यात अस्पृश्यांचा लष्करी पेशा एक महत्त्वाचे कारण होते. अस्पृश्यांच्या लष्करी पेशाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, “नेपोलियनने ज्या इंग्लंड देशाला ‘दे माय धरणी ठाय’ असे केले, त्या देशाने मराठेशाहीचे उच्चाटन केले. त्याचे कारण मराठ्यांतील जातिभेदाची तेढ व आपापसातील दुही हे नसून ब्रिटिशांनी एतदेशीयांचे सैन्य उभारले हे होय. पण ते सैन्य असे अस्पृश्य जातीचे. अस्पृश्यांचे बळ जर इंग्रजांच्या पाठीशी नसते, तर हा देश त्यांना केव्हाही काबीज करता आला नसता.”

अस्पृश्य बांधवांना उपदेश करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, “अस्पृश्य वर्गाची सुधारणा होण्यास दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. आपल्या मनावर जो जुन्या, खुळचट, अनिष्ट विचारांचा गंज चढला आहे तो धुऊन निघाला पाहिजे. आचार, विचार आणि उच्चार यांची शुद्धी जोपर्यंत झाली नाही, तोपर्यंत अस्पृश्य समाजात जागृतीचे अथवा प्रगतीचे बीज कधीही रुजणार नाही. आपली तने अशा रीतीने सुसंस्कृत होण्यास आपण पांढरपेशाचा अवलंब केला पाहिजे.” परिषदेमध्ये काही स्पृश्य हिंदू पुढाऱ्यांशी महत्त्वाच्या ठरावांवर पाठिंबा देणारी भाषणे झाली. बापुराव जोशी यांनी सांगितले की, अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरचा कलंक आहे. तो धुऊन काढण्यासाठी प्रत्येक धर्मभिमानी हिंदूने एका पायावर सदैव सिद्ध असले पाहिजे. शेट तुळजारामभाई म्हणाले, अस्पृश्यांना स्पृश्यांप्रमाणेच नागरिकत्वाचे हक्क मिळाले पाहिजेत. या परिषदेत दहा ठराव संमत करण्यात आले.

त्याच रात्री विषय नियामक समितीत महाड नगरपालिकेच्या ठरावावर चर्चा झाली. अस्पृश्यांचा चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी परिषदेत उपस्थित असलेल्या सर्व प्रतिनिधींनी तेथे जाऊन पाणी प्यावे असे ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी सुरबा टिपणीसांच्या घरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, टिपणीस, शिवनकर, सहस्त्रबुद्धे आणि चित्रे यांनी तो विचार अंमलात कसा आणावा याविषयीची योजना आखली. दुपारी परिषद भरली. तेथे विचार विनिमय झाला व आणखी चार ठराव संमत झाले. परिषदेचे कामकाज संपले, असे

अध्यक्ष घोषित करणार तोच पूर्व संकेताप्रमाणे अनंतराव चित्रे ताडकन उठून म्हणाले, 'आपण महाड परिषदेचा ठराव अमलात आणू या.' हे ऐकून परिषदेचा मंडप टाळयांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. हिंदू धर्मावरील कलंक धुऊन टाकण्यास आपण एका पायावर सदैव तयार असले पाहिजे असे गर्जुन सांगणाऱ्या स्पृश्य वाचाळवीरांनी 'हा तर शुद्ध अविचार आणि उतावळेपणा आहे' असे म्हणत मंडपाच्या मागच्या दारातून पोबारा केला. काही क्षणातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चवदार तळयाकडे मोर्चा निघाला. चवदार तळयातील पाणी पशू, पक्षी, हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन सगळेच पीत असत. परंतु युगानयुगे राम, विष्णू, विठोबा या हिंदूंच्या देवांना आपले देव म्हणून माणणाऱ्या अस्पृश्य हिंदूंना मात्र या तळयाचे पाणी पिण्यास बंदी होती. 'स्वातंत्र्याचे हक्क भीक मागून मिळत नसतात. ते स्वसामर्थ्याने मिळवायचे असतात. देणगी म्हणून ते मिळत नसतात.' हे सत्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित बांधवांना सांगत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चवदार तळयाच्या पायऱ्या उतरून खाली गेले. खाली वाकले आणि तळयातील एक ओंजळभर पाणी प्राशन केले. त्या प्रचंड जन समुदायाने आपल्या स्वातंत्र्य सूर्याचे अनुकरण केले. त्यांनी आपला मानवी हक्क बजावला. लगेच मोर्चा परिषदेच्या ठिकाणी शांतपणे परतला आणि मोर्चाचे विसर्जन झाले. अशाप्रकारे चवदार तळयाचे पाणी प्राशन करून महाड परिषद समाप्त झाली.

**स्पृश्य समाजाची प्रतिक्रीया :**

अस्पृश्यांनी चवदार तळयातील पाणी प्राशन केले हे पाहून महाडातील सनातनी प्रचंड चिडले. वातावरण स्फोटक झाले. काही स्पृश्य हिंदू मंडपात शिरले. अस्पृश्यांना घायाळ केले. मंडपातील शिजलेल्या अन्नात माती कालवली! भांड्यांची मोडतोड केली. बाजारपेठेत जो जो अस्पृश्य दिसेल, त्याला त्याला मारहाण केली. काही अस्पृश्यांनी मुसलमानांच्या घरात आश्रय घेऊन आपला जीव वाचविला! 'अस्पृश्यांनी तळे बाटविले, त्याचे शुद्धीकरण केले पाहिजे' म्हणन महाडच्या सनातनी धर्ममार्तंडांनी तेथील विष्णू मंदिरात बैठक घेतली.

अस्पृश्य हिंदूंनी बाटविलेले 'चवदार तळे' जनावरांच्या मलमुत्राने शुद्ध करून घेण्याचा शास्त्राधार काढला. तळयातून १०८ घागरी पाणी काढून त्यात पंचगव्य मिसळले. वेदमंत्रांच्या उद्घोषणात ते पाणी पुन्हा तळयात ओतले आणि तळे शुद्ध झाल्याचे जाहीर केले.

**चवदार तळयाच्या संघर्षाने अस्पृश्यांना काय दिले? :**

अस्पृश्यांच्या स्पर्शाने अपवित्र झालेले चवदार तळे जनावरांच्या मलमुत्राने शुद्ध करून सनातनी स्पृश्यांनी पुन्हा एकदा आपल्या जात्याभिमान आणि कर्मठपणा सिद्ध केला. या घटनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अत्यंत व्यथित झाले. त्यांनी गर्जना केली की, 'अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक नसून तो आमच्या देहावरील कलंक आहे. तो धुऊन काढण्याचे पवित्र कार्य आमचे आम्ही स्वीकारले आहे. त्या कार्याच्या सिद्धीसाठी आपल्यापैकी काहीजणांना आत्मयज्ञ करावा लागला तरी हरकत नाही.'

चवदार तळयाच्या संघर्षाने शतकानुशतके स्पृश्य हिंदूंच्या गुलामगिरीत जखडलेला अस्पृश्य समाज आपले मानवी हक्क प्रस्थापित करण्यासाठी दंड थोपटून उभा ठाकला. अस्पृश्य समाज आता स्वाभिमानाने ताठ मान करून अन्यायाचा परिहार करण्यासाठी अनेक युगापासून प्रथमच दंड थोपटून उभा राहिला. मानवी

स्वातंत्र्याची भाषा बोलू लागला. अन्यायी धर्माची बंधने झुगारुन देण्यास सिद्ध झाला. उन्नतीसाठी आणि माणुसकीच्या हक्कासाठी स्वतःच झगडले पाहिजे याची जाणीव झाल्यामुळे त्याच्या स्वाभिमानाचे शस्त्र अधिकच धारदार बनले. आपल्या उद्धारकर्त्याने केलेला उपदेश तंतोतंत आचरणात आणावयास प्रारंभ केला. गुरेढोरे ओढणे, मेलेल्या जनावरांचे मांस खाणे, स्पृश्यांच्या घरी शिळ्या भाकरीचे तुकडे मागणे या लाचार जीवनक्रमाला फाटा दिला. मिळेल तो कामधंदा स्वाभिमानाने करू लागले.

**संदर्भ सूची :**


- ग. प्र. प्रधान, 'डॉ. आंबेडकर त्यांच्याच शब्दांत', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २६ जानेवारी २००९.
- प्रा. राम बिवलकर, प्रा. झुंबरलाल कांबळे, 'महाडचा मुक्ती संग्राम', राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, आक्टोंबर १९९६.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'बहिष्कृत भारतातील २२ एप्रिल १९२७ रोजी महाड येथील धर्मसंगर व वरील हिंदूंची जबाबदारी' या शीर्षकांचा अग्रलेख.
- प्रदीप गायकवाड (संपा.), 'बहिष्कृत भारत व मूकनायक अग्रलेख', क्षितिज पब्लिकेशन, लष्करीबाग नागपूर, सातवी आवृत्ती, २५ डिसेंबर २०१२.
- चां. भ. खैरमोडे, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड ३', सुगावा प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, २००३.
- धनंजय कीर, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण १४ एप्रिल १९९७.
- तेजसिंह (संपा.), 'आंबेडकरवादी विचारधारा और समाज', स्वराज्य प्रकाशन, दिल्ली.
- 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर (गौरवग्रंथ)', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३.
- शंकरराव खरात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार', इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.
- प्रा. हरी नरके, 'आधुनिक भारताचे शिल्पकार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर'.